प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

क्रमांक कक्ष-१६/आर-१/बुरडबांबू/संस्था/ ५९८/९७-९८
नागपूर ४४०००१ दिनांक 25 सप्टेंबर/१९९७.

प्रति,

वनसंरक्षक,
उत्तर चंद्रपूर/दक्षिण चंद्रपूर/नागपूर/
अमरावती/यवतमाळ वनवृत्त.

विषय:- विदर्भातील बुरड व बांबू व्यवसाय करणाऱ्या कुटुंबांना बांबूचा पुरवठा निस्तार दरावर करण्याबाबत.

बांबू सहकारी संस्थांनी नोंदणीकृत करण्याबाबत.

संदर्भ:- शासन निर्णय क्रमांक-आबापु-१०९५/प्र.क्रं-१२८/फ-९ मुंबई, दिनांक ३० मे १९९७.

बुरडांनी किंवा बांबू व्यवसाय करणाऱ्यांनी सहकारी संस्था स्थापन केल्यास त्यांना बांबूचे वाटप कशाप्रकारे करण्यात यावे याबाबत संदर्भीय शासन निर्णयाच्या परिच्छेद-६ अन्वये मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) म.रा. नागपूर यांना प्राधिकृत केले आहे, त्या अनुषंगाने बांबू सहकारी संस्थांनी नोंदणी करण्याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२-० "महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह ॲक्ट" खाली नोंदणीकृत झाल्याशिवाय कोणत्याही सहकारी संस्थेला बांबूचे वाटप करण्यात येणार नाही असे अस्तित्वात असलेल्या सर्व बांबू सहकारी संस्थांना संबंधित वनसंरक्षक यांनी कळवावे व पोचपावती प्राप्त करावी.

२-१ महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह सोसायटी ॲक्टनुसार नोंदणीकृत (Registered) ज्या सहकारी संस्थामध्ये सर्व सभासद बांबू पासून निरनिराळ्या वस्तु बनविणारे [illegible] संस्थांना निस्तार दराने बांबू पुरवठा करण्यात येईल. सर्व सभासद नोंदणीकृत तसेच बुरड बांबू कामगार असावे हे संस्थेच्या नोंदणीकरिता मुख्य तत्त्व आहे.

०-२ "महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह ॲक्ट" खाली बांबू सहकारी संस्थांनी नोंदणीकृत करण्याआधी मुख्य वनसंरक्षक (उत्पादन) म.रा. नागपूर यांचे कडून "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करणे क्रमप्राप्त राहील.

०-३ "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करणे करिता संबंधित संस्थांनी/होत असलेल्या संस्थांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील संबंधित उपवनसंरक्षक, यांचे कार्यालयात महाराष्ट्र कोऑपरेटिव्ह ॲक्टच्या विहीत प्रपत्रात अर्ज सादर करावा. उपवनसंरक्षक, यांनी सदर संस्थेबाबत ज्या विहीत नियमाप्रमाणे जंगल कामगार सहकारी संस्थांच्या नोंदणी करिता अर्जाची चाचणी करण्यात येते त्याप्रमाणे संपूर्ण चाचणी करावी. तसेच सदर संस्थेचे सर्व सभासद प्रत्यक्ष सक्रिय बांबू कामगार आहेत व त्यांना बुरड कार्ड देण्यात आले आहेत व खरोखर सदर संस्था सक्रिय बांबू कामगारांची संस्था असून बांबू पासून निरनिराळ्या वस्तु बनविण्याचे व विक्रीचे काम करीत आहे याबाबत जातीने खात्री केल्या नंतरच पुढील कार्यवाही करिता संबंधित वनसंरक्षक मार्फत या कार्यालयास पाठवावा.

०-४ सहकारी संस्थांना आवश्यक असलेल्या बांबूच्या मागणीसाठी अर्ज संबंधित वनसंरक्षक यांचे कडे करतील.

१) मागणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर, वनसंरक्षक, बांबूच्या उपलब्धतेनुसार कोणत्या वनविभागातून/डेपोतून बांबू पुरवठा करण्यात येणार आहे याबाबत संस्थेला व संबंधित वनविभागाचा आदेश निर्गमित करतील. सहकारी संस्थांना प्रती सदस्य/नोंदणीकृत बुरड/बांबू कामगार/प्रती वर्षी १५०० बांबू संस्थेच्या बुरड वह्यावर नोंदी घेवून उपलब्धतेनुसार निस्तार दरावर संस्थेच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत बांबू पुरवठा करण्यात येईल.

२] याकरिता संस्थेला स्वतःचे असे अलेले खर्च लागतील यांची बुरड वही परिक्षेत्र कार्यालयात जमा केल्यानंतर संस्थेकरिता स्वतंत्र बुरड वही जारी करण्यात येईल. सहकारी संस्थेमार्फत बुरड/बांबू वाटणार वहीवर बांबू पुरवठा सुरु केल्यानंतर त्या बुरड वहीवर बुरड/बांबू कामगारांना वैयक्तिक रित्या निस्तार दरावर बांबू पुरवठा केल्या जाणार नाही.

०-५ सहकारी संस्थांना ज्या डेपो मध्ये बांबू उपलब्ध असतील त्याच डेपो मधून बांबू उचलणे बंधनकारक राहील.

०-६ सहकारी संस्थांना निस्तार दर---विक्री कर ---वनविकास कर या दराने बांबू पुरवठा करण्यात येईल.

०-७ बांबू पुरवठ्याच्या आदेशाचे तारखेपासून १५ दिवसाचे आंत सहकारी संस्था संबंधित उपवनसंरक्षक यांचेकडे पूर्ण मालाची रक्कम भरणा करुन माल उचलावा लागेल.

०-८ सहकारी संस्थांना निस्तार दरावर पुरवठा केलेल्या बांबूच्या उपयोग फक्त बुरड कामातून तयार करण्यात येणाऱ्या विविध वस्तु [Articles] टोपली, चटई इत्यादी साठी उपयोगात आणतील.

०-९ सहकारी संस्थांना निस्तार दरावर पुरवठा करण्यात आलेल्या बांबू कुठल्याही परिस्थितीत विक्री करता येणार नाही तसेच सदर बांबूचा वापर बुरड काम व्यतीरीक्त इतर कामाकरिता म्हणजे सेंटरींग मंडप इत्यादीसाठी केल्यास, बांबूचा पुरवठा बंद करण्यात येईल व सदर संस्था त्यासाठी सवलतीस पात्र राहणार नाही. व सदर संस्थेच्या नोंदणी रद्द करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

१०-० सहकारी संस्थांना पुरवठा केलेल्या बांबू पासून तयार केलेल्या व विक्री केलेल्या मालाचा तपशील संबंधित परिक्षेत्र अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील. व सदर तपशील सादर केल्यानंतरच पुढील बांबू पुरवठा करण्यात येईल. तसेच सहकारी संस्थेच्या कामकाज तपासणी करण्याचा अधिकार संबंधित वनअधिकारी यांना राहतील.

११-० विविध वस्तु तयार करण्याकरिता निरुपयोगी/बुरड कामाकरिता निरुपयोगी असेला बांबू सहकारी संस्था, संबंधित उपवनसंरक्षक यांची परवानगी घेतल्या नंतरच विल्हेवाट लावतील.

१२-० सहकारी संस्थांना निस्तार दरावर पुरवठा करण्यात आलेल्या बांबूचा लेखा [साठा पुस्तक - Stock Book] ठेवावा लागेल. तसेच उपयोगात आणलेल्या बांबू पासून तयार मालाचे तपशील देखील [Stock Book] वर ठेवावा लागेल. व त्या बाबतचे मासिक/त्रैमासीक अहवाल संबंधित वनपरिक्षेत्र कार्यालया मार्फत उपवनअधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील. संबंधित वनअधिकारी यांना वेळोवेळी सहकारी संस्थांना पुरवठा करण्यात आलेल्या बांबू बाबत [Stock verification] साठा पडताळणी करण्या बाबतचे अधिकार राहतील.

मुख्य वनसंरक्षक [उत्पादन]
महाराष्ट्र राज्य, नागपूर

प्रतिलीपी:- उपवनसंरक्षक सर्व [विदर्भातील]
प्रतिलीपी:- कक्ष अधिकारी फ-२, महसूल व वनविभाग मंत्रालय, मुंबई यांना रवाना
प्रतिलीपी:- सचिव [वने] महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांना संदर्भा क्र. च्या निर्णयाचे अनुषंगाने माहीतीस सस्नेह अग्रेषित.